पुणे जिल्ह्यातील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी पुणे यांचे अधिनस्त एकूण ७ शासकीय संस्थांसाठी सन २०१५-१६ च्या पुरवठा दराने दि.१.४.२०१६ ते दि. १२.४.२०१७ अखेर केलेल्या खर्चास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.बालगृ-२०१५/प्र.क.८८/का -८
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक -२१ जून, २०१९.

<u>संदर्भ</u> : १.उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखसं-१०८८/(२५१२)/उद्योग-६
२.आयुक्त, महिला बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचे क्र. मबाविआ/बावि/का-५/ २०१७-१८/ ई-निविदा/पुणे-७ संस्था/ प्रशा मान्यता/१९०८ दिनांक २२.३.२०१८

<u>प्रस्तावना :-</u>

महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचे नियंत्रणाखालील १) पंडित जवाहरलाल नेहरु उद्योग केंद्र येरवडा पुणे-६ विशेष बालगृह येरवडा, गोल्फ मैदानाजवळ पुणे-४११ ००६. २) शासकीय मुलांचे वरिष्ठ बालगृह येरवडा जेल रोड, पुणे-४११००६ (अनुरक्षणगृह) ३) शासकीय मुलींचे निरीक्षणगृह/ विशेष बालगृह मुंढवा. ४) शासकीय मुलींचे कनिष्ठ/वरिष्ठ बालगृह शिरुर, जि. पुणे. ५) शासकीय महिला राज्यगृह मुंढवा, पुणे. ६) शासकीय महिला स्वीकार केंद्र बारामती (प्रेरणा महिला वसतिगृह) तांदुळवाडी, ता.बारामती, जि. पुणे. ७) शासकीय भिक्षेकरी स्वीकार केंद्र, फुलेनगर, येरवडा, पुणे या सात संस्थांना दि.१.४.२०१६ ते दि.१२.४.२०१७ या कालावधीत केलेल्या पुरवठा खर्चास सन २०१५-१६ च्या मंजूर ई-निविदा दराने मान्यता देण्याची आयुक्तालयाच्या दि.२२.३.२०१८ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

२. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे दि.५.८.२०१५ रोजीचे पुरवठा आदेश हे उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागाचा शासन निर्णय दि.२.१.१९९२ लागू असतानाचे दि.१.४.२०१६ ते दि.१२.४.२०१७ या कालावधीत सुधारित निविदा न काढता केलेल्या खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी संदर्भाधीन क्र.२ अन्वये जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे या कार्यालयाच्या अधिनस्त महिला व बाल बालकांच्या ७ शासकीय संस्थांसाठी दि.१.४.२०१६ ते दि.१२.४.२०१७ या कालावधीत अन्नधान्य व इतर खाद्योपयोगी वस्तू व नित्योपयोगी किरकोळ वस्तूंच्या सन २०१५-१६ च्या पुरवठा दराने करण्यात

आलेल्या खरेदी खर्चास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदरची देयके अदा करण्याच्या अनुषंगाने नियमानुसार आवश्यक कार्यवाही संबंधितांकडून करण्यात यावी.

२. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०६२११४४८३८५९३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women and Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c16934e9cb6672cc02aa258b08, serialNumber=f9bd2a7c214922f8f4939e80711ece461c9dfd9c679b28f98e79475c5ea90e21, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2019.06.21 14:49:54 +05'30'

(स्मिता निवतकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा.राज्यपाल, यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई .
३. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा ,महाराष्ट्र विधानमंडळ. मुंबई .
४. मा.सभापती/उपसभापती विधानपरिषद ,महाराष्ट्र विधानमंडळ. मुंबई .
५. मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा /विधानपरिषद,महाराष्ट्र विधीमंडळ.
६. मा.मंत्री (म व बा वि)/ राज्यमंत्री(म व बा वि),यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय ,मुंबई .
७. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव,मंत्रालय,मुंबई
८. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव (व्यय),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
१०.सचिव, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
११.प्रधान सचिव (ले. व को.),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.आयुक्त , महिला व बाल विकास आयुक्तालय,म.रा. पुणे.
१३.महालेखापाल १, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),मुंबई
१४.महालेखापाल २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),नागपूर
१५.संचालक,लेखा व कोषागरे संचालनालय,म.रा.मुंबई
१६.संचालक,स्थानिक निधी लेखा परीक्षा,कोकण भवन,नवी मुंबई
१७.सर्व उपसचिव ,सर्व अवर सचिव, महिला व बाल विकास. नवीन प्रशासकीय भवन , मुंबई
१८. उपायुक्त (बालविकास) महिला व बाल विकास आयुक्तालय, म.रा.पुणे.
१९.वित्त विभाग (व्यय-६/अर्थसंकल्प-७/कोषा-प्रशा-२), नियोजन विभाग (का-१४७२) मंत्रालय, मुंबई -३२,
२०.सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
२१.सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन , मुंबई
२२.निवड नस्ती का-८